


तुम्ही-आम्ही

# पालक

परिपूर्ण पालकत्व

पुणे • वर्ष १ • अंक १ • ऑगस्ट २०१३ • किंमत ₹ ५०

- उक्तीप्रमाणे कृती हेच खरे पालकत्व **-डॉ. प्रकाश आमटे**
- मुलांच्या संगोपनाचे महत्त्व सन्मानित करणारा **पालकदिन**
- वैद्यकीय प्रवेश परीक्षेचा **'नीट' धडा**
- शिक्षकांनो, विद्यार्थ्यांचे **पालक व्हा...**
- **साने गुरुजींचा** विद्यार्थ्यांशी संवाद



# बालभवन हवे, आम्हाला बालभवन हवे!

**बालभवन म्हणजे इथे नुसतं खेळ शिकवणं नाही, तर मुलांसोबत मुलांसारखं होणं, त्यांना बरोबरीनं वागवणं त्यांना हवं ते करून बघण्याची मोकळीक देणं - बालभवनमध्ये स्पर्धा होत नाहीत, ना एकमेकांशी तुलना! ना कुठली पदकं! त्यामुळे कोणाचाही कोणाच्या पायात पाय नाही. इथे प्रत्येक मूल हे खासच असतं.**



**दीपा देशमुख**
adipaa@gmail.com
लेखिका सामाजिक कार्यकर्त्या आहेत.



गरवारे बालभवनच्या संचालिका शोभाताई भागवत





विनोबांनी शिक्षणाविषयी फार सुंदर विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणतात, "शिक्षक आणि मुले दोघेही एकमेकांच्या आचरणातून शिकत असतात. दोघेही विद्यार्थीच आहेत. जे दिले जात नाही ते शिक्षण. जे घेतले जाते, ज्याचा हिशोब ठेवला जाऊ शकतो किंवा ज्याची नोंद ठेवली जाऊ शकते ते शिक्षण नाही. शिक्षणाची मोजदाद करता येत नाही. जीवनच शिक्षण आहे. कॅलरीजचा खरा हिशोब कागदावर नव्हे, शरीरावर दिसून येतो. जे अनुभवले, खाल्ले, पचले, रक्तात मुरले तेच शिक्षण."

असं निकोप, निर्भेळ शिक्षण आज मुलांना मिळत आहे का? या विचारात असतानाच मला सारसबागेसमोर गरवारे बालभवनच्या कमानीच्या आत मुलांचा चिवचिवाट कानावर पडला. मुलं गाणं गात होती,

बालभवन हवे, आम्हाला बालभवन हवे
हे क्रीडांगण आमचे
हे प्रेक्षागृह आमचे
इथे उमलत नव्या कल्पना
आम्ही मित्रासवे
आम्हाला हवे ते मित्र नवे
बालभवन हवे, आम्हाला बालभवन हवे
स्वप्ने बघू उद्याची
हिम्मत धरू मनाची
इथुनी पाहू प्रत्यक्षाचे
विशाल क्षितिज पुढे
आम्ही मिळवू पंख नवे
बालभवन हवे, आम्हाला बालभवन हवे
दुनियेत कुठेही जाऊ
परी इथेच परतुनी येऊ
घरटे अक्षय आनंदाचे
लावू लक्ष दिवे
बालभवन हवे, आम्हाला बालभवन हवे

गाणं म्हणून झाल्यावर मुलं खेळात दंग झाली. मुलांसोबत मुलांच्या ताईही त्या खेळात सामील असलेल्या दिसल्या. काही जण गेटजवळ काही क्षण थांबून कौतुकभरल्या नजरेनं ते दृश्य पाहत उभे होते. शोभा भागवत यांच्याशी बातचीत करण्यासाठी मी गेटचं दार उघडून आत गेले आणि मनात असलेल्या अनेक प्रश्नांना वाट करून दिली.

शोभा भागवत या गरवारे बालभवनच्या संचालिका! शोभाताईंनी मराठी आणि संस्कृत भाषा घेऊन एम. ए. ही पदवी प्राप्त केली. त्यांनी पुण्यातल्या 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन' या नामांकित संस्थेत डॉ. चित्रा नाईक यांच्याबरोबर प्रौढ आणि अनौपचारिक शिक्षणासाठी काम आणि संशोधन केलं. त्यांनी झोपडपट्टीतली मुलं आणि ग्रामीण भागातल्या स्त्रिया, स्त्री-वाणी अभ्यास केंद्र आणि दलित स्त्रियांच्या प्रश्नांवर काम केलं असून त्या एक उत्तम लेखिका म्हणूनही प्रसिद्ध आहेत.


शोभाताईंसोबत गप्पा मारताना माझ्या मनातल्या प्रश्नांची उत्तर आपोआपच मिळत गेली. गरवारे बालभवनचा इतिहास मला उलगडत गेला. १९७९ साल हे आतंरराष्ट्रीय बालक वर्षं म्हणून जगभर साजरं केलं जात असताना पुणे महानगरपालिकेनं मुलांसाठी एक सुंदर ठराव पास केला. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी २ एकरांची जागा पास झाली होती. त्या वेळचे पुण्याचे द्रष्टे आयुक्त पु. स. पाळंदे आणि यशस्वी उद्योजक आबासाहेब गरवारे यांच्या एकत्रित येण्यानं 'गरवारे बालभवन'च्या इमारतीनं आकार घ्यायला सुरुवात केली. १ सप्टेंबर १९८५ साली पुणे महानगरपालिका आणि गरवारे ट्रस्ट यांचा संयुक्त प्रकल्प म्हणजे - बालभवन सुरू झालं. पब्लिक आणि प्रायव्हेट पार्टनरशिपचं एक अनोखं आणि आदर्श उदाहरण आहे. आज पुण्यात २००च्या वर बालभवनं सुरू आहेत. पुण्याबरोबरच औरंगाबाद, नगर, संगमनेर, ठाणे, नाशिक, सासवड, लातूर, कोल्हापूर आणि बारामती येथे बालभवनं सुरू झाली. गरवारे बालभवनच्या अधिक माहितीसाठी आपण वेबसाईटला भेट देऊन सविस्तर माहिती जाणून घेऊ शकता - www.garwarebalbhavanpune.org

बालभवनमध्ये काय आहे बरं? मुलांसाठीचं अनुकूल वातावरण! मुलांना खेळण्यासाठी भरपूर घसरगुंड्या, छोटासा तलाव, मुलांनी डिझाईन केलेला बोगदा, तंबू आणि उंच उंच झाडी! इथे कोणीही रागावत नाही, डोळे वटारत नाही ना छडी घेऊन मारतही नाही. मी बालभवनमध्य प्रवेश करताना मुलं जे गाणं गात होती, ते गाणं बालभवनच्या स्थापनेपासून मुलं गात आहेत. हे गाणं श्यामला वनारसे यांनी बालभवनसाठी लिहिलं आहे.

बालभवन म्हणजे काय - तर शोभाताई म्हणतात, ''बालभवन म्हणजे इथे नुसतं खेळ शिकवणं नाही, तर मुलांसोबत मुलांसारखं होणं, त्यांना बरोबरीनं वागवणं - त्यांना हवं







ते करून बघण्याची मोकळीक देणं - बालभवनमध्ये स्पर्धा होत नाहीत, ना एकमेकांशी तुलना! ना कुठली पदकं! त्यामुळे कोणाचाही कोणाच्या पायात पाय नाही. इथे प्रत्येक मूल हे खासच असतं. इतर काही मंडळी भुवया उंचावून प्रश्नही करतात, हे काय? स्पर्धा नाही? मग आमची मुलं उत्तम खेळाडू कसे बनतील? त्यांना उत्तर हेच, की बालेवाडीजवळ स्पोर्टसिटी बनवली की! हे अवाढव्य स्टेडियम आणि काय काय....पण फक्त लॅव्हिश, स्टेडियम बांधून होत नाही तर त्यासाठी मुलांच्या जडणघडणीसाठी खूप काही रुजवण्याची गरज असते. गरवारे बालभवन - इथे होतो उत्सव!''

लहान मुलांना हवा असतो निवांत वेळ, त्यांच्या मनातल्या गोष्टी करून बघण्यासाठीची मोकळीक, आपल्या मित्र-मैत्रिणींबरोबरचा संवाद आणि मोठ्यांचं प्रेम. मग मुलं हसतात, खेळतात - अनेक गमतीजमती करतात. शोभाताईंच्या बाबतीत घडलेला एक अनुभव - शोभाताई टॉयलेटला जाताना त्यांना तिथे एक चिमुकली बसलेली दिसली. शोभाताईं तिच्याकडे पाहून हसताच त्यांना पाहून ती म्हणाली, ''ए आत गेल्यावर कडी लावू नकोस हं. मी आहे इथेच बाहेर.'' शोभाताईंनी आतून कडी लावली आणि बाहेर पडण्यासाठी कडी काढली तर काय - दारच उघडेना - बाहेरून कोणीतरी कडी लावलेली. दारावरच्या थोड्याशा थापाथापीनं तिथून जाणाऱ्या एका ताईनं दार उघडलं. तेव्हा शोभाताईंनी अजूनही दाराबाहेर उभ्या असलेल्या त्या चिमुरडीला विचारलं, ''अगं, तू असं का केलंस?'' तेव्हा ती डोळे मोठ्ठे करत, ठसक्यात बोलती झाली, ''तुला सांगितलं होतं ना, आतून कडी लावू नकोस, मी आहे बाहेर म्हणून? मग का लावलीस कडी? ऐकत नाहीस ना? म्हणूनच मी बाहेरून कडी लावली.'' तिचं ते उत्तर ऐकून शोभाताईंना गंमत तर वाटली. पण हे बालसुलभ वागणं, पालकांचं केलेलं अनुकरण, तो निर्व्याजपणा जपताना - किती गोष्टी संयमाने कराव्या लागतात. या मुलांचं वाढणं किती निकोपपणे घडवावं लागतं हे बालभवनमध्ये गेल्यावर तिथल्या ताईंची लगबग आणि धडपड पाहिल्यावर समजतं.

बालभवनमध्ये बालदिन आगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. गरीब मुलांसाठी आणि वंचितांसाठी काम करणाऱ्या अनेक संस्था मिळून या कार्यक्रमाचं आयोजन होतं. १० बालभवन, १० वेगवेगळ्या संस्था मिळून अशी सुमारे २०० मुलं या दिवशी एकत्र येतात. मुलं या दिवशी वैज्ञानिक खेळणी करून बघतात, हाताळतात, एकूणच मज्जा करतात. आपल्याकडे अनेक एक्झिबिशन्स सतत सुरू असतात. मुलांसाठीच्या प्रदर्शनांमध्ये मुलांनाच खेळणी दुरूनच बघावी लागतात. त्यांना हाताळण्यासदेखील तिथे बंदीच असते. ही प्रदर्शनं आपल्यासाठी नाहीतच असंच मुलांना वाटायला लागतं. मात्र बालभवनमध्ये मुलांच्या हाताला काम मिळतं. मुलं शेती करतात, भाज्या पिकवतात आणि झालंच तर शाडूच्या मातीचे गणपतीही बनवतात. गेली २७ वर्षं या प्रकारचे उपक्रम बालभवनमध्ये सातत्यानं सुरू आहेत. मुलांच्या संमेलनांमध्ये मुलं काय काय करायचं ठरवतात. मात्र यात त्यांच्या उत्साही पालकांना खर्चाच्या बाबतीत आवर घालण्याचं कामही बालभवन करतं. आपल्या जवळ असलेल्याच गोष्टींमधून ही संमेलनं साजरी होतात.

बालभवनमध्ये मुलं १०० प्रकारचे खेळ शिकतात, खेळतात. त्यांच्या खेळातून, त्यांच्या कृतीतून हळूहळू त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा पाया आकार घेऊ लागतो. इथे रोज जवळपास दुपारी साडेचार ते सायंकाळी सव्वासात

१. गोष्टी सांगताना विद्यार्थी

२. शाडू मातीचे गणपती बनविताना

३. स्नेहसंमेलनातील एक प्रसंग

पर्यंत १०० मुलं खेळायला येतात. इथे येणारं मुलं रोज वेगळे उपक्रम शिकत असतं. ही येणारी मुलं इथे खेळाबरोबरच व्यायामही करतात. चित्रं काढतात, वेगवेगळ्या वस्तू तयार करून बघतात. गोष्टी आणि गाणी ऐकतात आणि स्वतःही सांगतात. नाच करतात, नाटकं करतात. सण जवळ आले की मग काय मुलांच्या उत्साहाला उधाणच येतं. ही सगळी बच्चेकंपनी मग किल्ला बनवण्यासाठी कंबर कसतात. किल्ल्याभोवतालची सजावट, आकाशकंदिल, रांगोळी सगळं सगळं सगळे मिळून करतात.

बालभवनची मुलं सहलीलाही जातात. पक्षी निरीक्षण करतात. पर्यावरण हा विषय वेगळा घेऊन शिकावाच लागत नाही. घरी आणि शाळेत जे करता येत नाही ते सारं इथे मुलांना करता येतं. शोभाताई म्हणतात, ''लहानपणी मूल जे अनुभव घेतं, त्या अनुभवातून ते तयार होतं. मोठेपणी हे अनुभव त्याला जास्त मजबूत, खंबीर बनवतात'' ही मुलं कारखान्यांनाही भेटी देतात. उन्हाळी सुट्टीत एप्रिल ते मे महिन्यात जवळजवळ ३० च्या वर शिबिरं बालभवनमध्ये पार पाडली जातात. या शिबिरांमधून मुलं आपलं शहर समजून घेतात. पुण्यातल्या नद्या, डोंगर, टेकड्या, बागा, ऐतिहासिक ठिकाणं, देवळं, शाळा, पुतळे, गरीब वस्त्या, श्रीमंत वस्त्या, उद्योग, बाजार सारं बघतात. त्याविषयी मग गप्पाही होतात आणि या गप्पांमधूनच त्यांचं कळत-नकळत शिक्षण होत जातं. कल्पना संचेती यांचं वाचनविषयक आणि उमा बापट यांचं 'आईचं शेपूट' हेही शिबिरं तर वर्षभर बालभवनमध्ये चालू असतात. ग्रामीण-शहरी, गरीब-श्रीमंत या साऱ्याच मुलांचं अभिसरण घडावं म्हणून वेगवेगळ्या भागातली २०-२५ मुलं एकत्रित येतात आणि गप्पांमधून ती एकमेकांना समजूनही घेतात.

मुलांसाठी अनेक पुस्तकंही बालभवनच्या 'कजा कजा मरू' या प्रकाशनातर्फे प्रकाशित झाली आहेत. वैज्ञानिक अरविंद गुप्ता यांच्या प्रेरणेतून याही कामानं गती घेतली आहे. ही पुस्तकं अत्यंत कमी किमतीत मुलांना विक्रीसाठी गरवारे बालभवनमध्ये उपलब्ध आहेत. बालभवनमध्ये मुलांसाठी आणि पालकांसाठी दोघांसाठीही वाचनालय आहे. अर्थातच त्याची फी देखील अत्यंत कमी अशीच आहे.

शोभाताई म्हणतात, ''बालभवनमध्ये मुलांसाठीच केवळ नाही, तर पालकांसाठीही शिबिरं घेतली जातात. पालकांच्या सभाही होतात. यातून पालकांचंही शिक्षण होत राहतं. बालभवनमध्ये येणाऱ्या बालकांसाठी आकारण्यात येणारी फी अत्यंत अल्प आहे. बालभवन पालकांसाठी पाच प्रश्न उपस्थित करतं:

१. आपण पालक म्हणून कसे आहोत?
२. आपण मुलांशी कसे बोलतो आणि कसे वागतो?
३. आपलं मूल कसं आहे?
४. आपलं घर मुलांना काय देतं?
५. मुलांचं आणि आपलं जग कसं मोठं करायचं?

या प्रश्नांवर पालकांनी नक्कीच विचार करायला हवा. पालकशिक्षण हे नुसतं विविध विषयांवर भाषणं देऊन होत नाही. बालवाडीच्या वयापासून पालकांसाठीदेखील अभ्यासक्रम आखायला हवेत. आज स्वतंत्र कुटुंब पद्धती असून मुलाचा जन्म होतो, तेव्हा मुलांना वाढवायचा अनुभव नसल्यामुळे जोडप्याची तारांबळ उडते. पालकांनी स्वतःचं आणि मुलांचं जग मोठं करण्याची गरज आहे. पालकांच्या बेबंद अपेक्षांतूनही मुलांचा बचाव करायला हवा आहे. ही जबाबदारी नीटपणे







४. शेतात भाज्यांची लागवड करताना

५. कारखान्याला अभ्यास भेट

६. निसर्गसहल

पार पाडण्यासाठी सुजाण पालकत्वाचं भान येणं खूप गरजेचं आहे. मुलांकडे दुर्लक्ष करणं, त्यांना धमक्या देणं, त्यांची इतरांशी तुलना करणं, त्यांच्याविषयीचे निर्णय स्वतःच त्यांना विश्वासात न घेता घेणं, त्यांना रागावणं, मारहाण करणं, अनेक गोष्टींत दोषी ठरवणं अशा अनेक गोष्टी पालकांनी टाळल्या पाहिजेत.''

पालकांसाठीचं हे शिबिर स्वत: शोभाताई आणि अनिल भागवत हे घेतात.

आज बालभवनमधून जाणाऱ्या मुलांमधून जबाबदार नागरिकत्वाचं दर्शन घडतं. बालभवनच्या कल्पना संचेती यांच्या दोन्ही मुली आज शेती करतात, तर सानिका बापट ही अमेरिकेत गेली, पण बालभवनच्या आठवणींमुळे तिथल्या बालवाडीत जाऊन साह्य करू लागली. डॉ. मुक्ता गुंडी ही संवेदनशील, सामाजिक प्रश्नांचं भान असलेली तरुणीही बालभवनच्याच तालमीत तयार झालेली!

शोभाताई म्हणाल्या, ''मुलांसाठीचं काम कधीच मर्यादित नसतं. फक्त गरवारे बालभवनच नाही तर इतरत्र असलेल्या मुलांसाठी बालभवनं उघडली जावीत म्हणून अनेक पालकांनी, शिक्षकांनी आणि इच्छुकांनी 'आम्हालाही आमच्या परिसरात बालभवन सुरू करायचं आहे, त्यासाठी आम्हाला मार्गदर्शन करा' अशी मागणी सुरू केली आणि त्यातूनच आम्ही प्रशिक्षणाचं नियोजन केलं. ही प्रशिक्षणं उन्हाळी सुट्टीत चालतात.''

बालभवन सुरू झालं तेव्हा २०० मुलांनाच प्रवेश दिला गेला. त्या वेळी कार्यकर्त्या म्हणून १० जणी काम करू लागल्या. प्रत्येकीवर २० मुलांची जबाबदारी होती. पण त्यानंतर थोड्याच दिवसांत प्रवेशासाठी मुलांची वाढलेली प्रतीक्षा यादी बघून बालभवनची संख्या वाढायला हवी या जाणिवेतून प्रशिक्षणांनी जन्म घेतला. बालभवनमध्ये काम करण्यासाठी कार्यकर्त्यांसाठी एकच अट आहे, ती म्हणजे मुलांमध्ये काम करण्याची त्याला आवड असायला हवी आणि तो किंवा ती पदवीधर असावी. या कार्यकर्त्यांचंही प्रशिक्षण जुलै आणि फेब्रुवारी महिन्यात १५ दिवसांचं घेतलं जातं. या प्रशिक्षणासाठी ग्रामीण भागाबरोबरच आयटी प्रोफेशनल्स, डॉक्टर, इंजिनीअर, प्राध्यापक, तरुण आया, आजी-आजोबा, संस्थांचे कार्यकर्ते आणि कॉलेजचे विद्यार्थी-विद्यार्थिनीही येतात. या प्रशिक्षणांमुळे बालभवन हिनं एका चळवळीचंच रूप धारण केलंय.

आज मुलांना मनसोक्त खेळण्यासाठी, संवादासाठी, काही सांगण्यासाठी, बोलण्यासाठी आणि ऐकण्यासाठी ठिकाणच आहे कुठे? सोसायटीत मुलांनी खेळायचं म्हटलं, तर इतर सदस्य तक्रार करतात, नियम करतात आणि मुलांनी खेळू नये यासाठी आटापिटा करतात. एका सोसायटीनं तर मुलं सोसायटीत खेळतात आणि त्यांना खेळू देऊ नये यासाठी ५००० रुपयाचं आमिषही दाखवलं होतं म्हणे. ही झाली सोसायट्यांची तऱ्हा - पण इतरही अनेक मंडळींना मुलांचं हे खेळणं डोळ्याला खुपतं.

शोभाताई म्हणतात, ''आज शहरी वातावरणात एका बंदिस्त कोषात आपण मुलांना वाढवतो आहोत आणि स्पर्धेत धावणारी घोडी तयार करतो आहोत. आजची मुलं घरात टीव्हीसमोर आणि शाळेत फळ्यासमोर बसून असतात. त्यामुळे अशा मुलांचं धावणं, पळणं, कोलांट्या उड्या मारणं जवळपास बंद झालं आहे. त्यांच्या शरीराचा लवचिकपणा वयाच्या तिसऱ्या वर्षापासून कमी होतो आहे. त्यांच्या आहाराचा विचार करायलाही त्यांच्या पालकांना आज वेळ नाही. त्यांच्याशी संवाद साधायला वेळ नाही. फक्त कम्प्युटर मित्र. अशी मुलं विकृत होण्याची भीती वाटते.

आज शाळा म्हणजे कोंबड्यांच्या खुराड्यांसारखीच भासायला लागली आहेत. एकेका वर्गात दाटीवाटीनं कोंबून बसवलेली मुलांची ती गर्दी बघितली की लक्षात येतं, या प्रत्येक मुलाला अटेन्शन हवं आहे, त्यांच्याकडे लक्ष देणारं, त्यांच्याशी बोलणारं, त्यांना ऐकणारं कोणी हवं आहे. ते या गर्दीत कसं शक्य आहे? शाळांना हा वेळ देता येतो का? आणि पालक? पालकांनाही दुर्दैवानं आज तो वेळ नाही. आपली मुलं शाळांवर सोपवून ती निर्धास्त होतात.''

शोभाताई आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी बालभवनच्या कार्यात स्वत:ला वाहून घेतलं आहे. त्यामुळे त्यांना वाटणारी खंत ही तितकीच विचार करायला भाग पाडणारी आहे. शोभाताईंचा निरोप घेऊन - बालभवनला शुभेच्छा देऊन मी गेटबाहेर पडले तर खरी, पण मनातल्या विचारांनी मला खूप अस्वस्थ केलंय.

आजच्या वेगवान आयुष्यात पालकांनी, सुजाण नागरिकांनी मुलांचा निकोप विकास होण्यासाठी काय करायला हवंय?

आज श्रीमंताच्या मुलांसाठी पंचतारांकित शाळा आणि सर्वसामान्यांसाठी साधारण शाळा यांमुळे बालवयापासूनच एक दरी निर्माण होते आहे. गरीब-श्रीमंत हा भेद नको त्या वयात रुजू पाहतो आहे. ही मुलं जास्त घट्ट होण्याआधीच सावध व्हायला हवं आहे. प्रत्येक मोकळ्या जागेकडे उत्पन्नाचं आणि नफ्याचं साधन म्हणून पाहता कामा नये. त्यातूनच सारसबागेसमोरची ऐन मोक्याची जागा मोहात पाडायला लागते.

इथे मॉल बांधावा का? का इथे भंगार मालाचा बाजार भरवावा? इथे नावाला एखादा पुतळा बांधून बाकी जागेवर आपल्या मनासारखी कमर्शियल इमारत बांधावी का आणि त्यातून पैसेच पैसे कमवावेत का अशी स्वप्नं काही मंडळी बघताहेत. बरं ही नुसती स्वप्नं पडतच नाहीत, तर ती साकारण्यासाठी यांचे वाट्टेल ते प्रयत्नही चालू झाले. ६० कोटींची जागा आणि मुलांनी खेळून वाया घालवणं या मंडळींना जराही रुचलं नाही. मुलांच्या आवडत्या मैदानावर अतिक्रमण होतंय म्हटल्यावर मात्र सगळे पालक एकत्र झाले आणि पुण्यातले सजग नागरिक आणि पालक यांनी मिळून हा प्रयत्न हाणून पाडला. यापुढेही बालभवनची हक्काची जागा शाबूत ठेवणं ही आपली सगळ्यांचीच जबाबदारी आहे.

पुणे शहरात बालभवनच्या निर्मितीमध्ये पुणे महानगरपालिकेचा खूप महत्त्वाचा वाटा आहे. मुलांसाठी, मुलांच्या निकोप -सर्वांगीण वाढीसाठी त्यांनी जे केलं ते इतरांसाठीही एक आदर्श उदाहरण आहे. हाच आदर्श इतर शहरांनी घ्यायला हवा असं वाटतं. अशी बालभवन अबाधित राहिली पाहिजेत, किंबहुना ती अधिकाधिक वाढली पाहिजेत. मुलांच्या मैदानांकडे, त्यांच्या खेळण्याच्या जागेकडे केवळ नफ्याच्या दृष्टीने पाहणं हे निंदनीय आहे. म्हणून आज प्रत्येक शहरात - प्रत्येक वार्डात मुलांसाठी बालभवन झालं पाहिजे. मुलांसाठीची जागा राखीव असायलाच हवी. खेळणं हा मुलांचा हक्क आहे. त्यासाठी बालभवन हवंच हवं. भारताचे पहिले पंतप्रधान पं. नेहरू यांची मुलांसाठी खूप स्वप्नं होती. मुलांसाठी हक्काचं बालभवन झालंच पाहिजे हा निश्चय करून पं. नेहरूंचं स्वप्न साकार करू या.

शोभाताई म्हणतात, ''बालभवन आज जे उपक्रम चालवत आहे, त्यात आणखी नवनवे प्रयोग करण्याची इच्छा आहे. मात्र ही ऊर्जा, ही शक्ती बालभवनच्या सर्जनशील प्रयोगासाठीच खर्च व्हावी, भांडणासाठी नको. आज भांडावं लागतं आहे, लढावं लागतं आहे, पण हे भांडण किंवा लढणं कोणा एकाच्या विरोधात नसून केवळ मुलांच्या हक्कांसाठी आहे.''